Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Volume-3, Issue-4, Oct-2013 Available online at www.aygrt.isrj.net

†«ŸÖ ŸÖ¢½Ö-ान आणि सामाजिक समता यांची सांगड घालणारी पं. श्रीधरशास्त्री पाठकांची तत्त्वप्रणाली

रावसाहेब भिमराव नेरकर,

इतिहास विभाग प्रमुख, राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय, पारोळा, जि. जळगांव.

Ãõõ¸Ö¿Ö :- आद्य श्री शंकराचार्यांनी अखिल भारत वर्षात वैदिक धर्माचा पवित्र –ेंडा फडकविला. त्याचप्रमाणे अद्वैत तत्त्व–ानाचा प्रचार आणि प्रसार केला. 'आद्य शंकराचार्यांचे असे म्हणणे आहे की, (१) मी, तू किंवा मनुष्याच्या डोळ्यांस दिसणारे जगत् - म्हणजे सृष्टीतील पदार्थांचे नानात्व - खरे नसून या सर्वांत एकच शुद्ध व नित्य परब्रह्म भरलेले आहे, आणि त्याच्या मायेने मनुष्याच्या इंद्रियांस नानात्वाचा भास होत असतो; तसेच (२) मनुष्याचा आत्माही मुळात परब्रह्मारूपींच असतो, आणि (३) आत्म्याच्या व परब्रह्माच्या या ऐक्याचे पूर्ण –ान म्हणजे अनुभवात्मक ओळख –ाल्याखेरीज कोणासही मोक्ष मिळणे शक्य नाही यासच 'अद्वैतवाद' असे म्हणतात. कारण, एका शुद्ध, बुद्ध, नित्य व मुक्त परब्रह्माखेरीज दुसरी कोणतीही स्वतंत्र व सत्य वस्तु नाही; डोळ्यांना दिसणारे नानात्व हा मानवी दृष्टीचा भ्रम किंवा मायेच्या उपाधीमुळे होणारा आभास आहे; माया ही दुसरी खरी व स्वतंत्र वस्तु नाही, मिथ्या आहे, असे या सिद्धांताचे तात्पर्य आहे'.[1] या आद्य शंकराचार्यांनी प्रतिपादलेल्या अद्वैत तत्त्व–ानाची सांगोपांग यथार्थता समाजाला पटवून देण्याचे महत्वपूर्ण कार्य पं. श्रीधरशास्त्रींनी केले.

प्रस्तावना-

भारतीय संस्कृतीत अद्वैत तत्त्व–ानाला अनन्य साधारण महत्व आहे. 'हिंदूस्थानच्या उत्तरेस ज्याप्रमाणे उत्तुंग गौरीशंकर शिखर उभे आहे, त्याचप्रमाणे येथील संस्कृतीच्या पाठीशीही उत्तुंग व भव्य असे अद्वैतदर्शन आहे. कैलासावर बसून –ानमय भगवान शंकर अद्वैताचा डमरू अनादी काळापासून वाजवीत आहेत. शिवाजवळ शक्ती असणार, सत्याजवळच सामर्थ्य असणार, प्रेमाजवळ पराक्रम असणार. अद्वैत म्हणजे शिवत्व. अद्वैत म्हणजे निर्भयता. या संसारात अद्वैताचा संदेशच सुखसागर निर्मू शकेल. भारतीय ऋषींनी ही महान वस्तू ओळखली. अद्वैताचा मंत्र त्यांनी जगाला दिला. या मंत्राइतका पवित्र मंत्र दुसरा कोणताही नाही. जगात दुजाभाव असणे म्हणजे दुःख असणे व समभाव म्हणजे सुख असणे. सुखासाठी धडपडणाऱ्या मानवाने अद्वैताची कास धरल्याशिवाय तरणोपाय नाही'.[2] ही कास पं. श्रीधरशास्त्रींनी धरली. आपल्या लेखनातून आणि व्याख्यानातून त्यांनी अद्वैत तत्त्व–ानाकडे समाजाचे लक्ष केंद्रित केले. पं. श्रीधरशास्त्रींनी अद्वैत तत्त्व–ानाविषयी सखोल अध्ययन केलेले होत. †ÖªÖ शंकराचार्यांनी मांडलेली अद्वैत तत्त्वप्रणाली पूर्णपणे समजून घेतलेली होती. अद्वैत ŸÖ¢½Ö–ानाविषयी त्यांनी प्रतिपादले की, 'श्रीशंकराचार्यांच्या मताने ब्रह्म हेच सत्य असून बाकी सर्व मिथ्या आहे. ज्याप्रमाणे शक्तीवर रजताचा आभास होतो. त्याप्रमाणे जगद वगैरे सर्व आभास होय. ब्रह्मा हे निर्गुण आहे. म्हणून त्याचे शब्दाने प्रतिपादन करता येत नाही. आणि म्हणूनच श्रुतिमध्ये ब्रह्मा हे वाणी व मन यांना अगोचर आहे असे सांगितले †ÖÆ. 'Ãõ½Ö–त्व' वगैरे ब्रह्माचे गुणदेखील औपाधिकच होत. जीव हा ब्रह्मरूप आहे; परंतु आपल्या अ–ानामुळे तो निराळा आहे असे भासते. सर्वांना 'मी' हा प्रत्यय मन, बुद्धी इत्यादीच्या उपाधीमुळे येतो. परंतु –ोपेत मन, बुद्धि इत्यादि उपाधि नसल्यामुळे 'अहम्' म्हणजे मी पणाचा प्रत्यय नसतो. त्याप्रमाणे मोक्षावस्थेमध्ये देखील उपाधींचा लय –ाल्यामुळे 'अहम्' या प्रत्ययाचा अभावच असतो. एवंच अहं ही प्रतीति औपाधिक म्हणजे ^¯ÖÖ–ÖÖ´ÖÔ †Ö»Ö»ÖÖ †ÖÆ'.[3] सर्व काही अद्वैत आहे, केवळ अ–ानामुळे आपणांस आभास होतो, अभेदात भेद व भेदात अभेदता हे भारतीय संस्कृतीचे खरे स्वरुप आहे. अद्वैताचा साक्षात्कार निश्चित होतो. परंतु 'त्यासाठी', अ–ानाचा त्याग केला पाहिजे. 'या सर्व जगांचे मूळ स्वरुप अविद्या आहे. ती अनादी असून त्रिगुणात्मक आहे'.[4] म्हणूनच प्रत्येकाला आत्मस्वरुपाचे –ान प्राप्तŸÖ –ÖÖ»Ö ¯ÖÖ×Æ•Ö. '†ÖŸ´ÖÃ½ºÖ¯ÖÖ"Ö •Ö †–ान ते म्हणजे (†ÖŸ´Ö–ानामुळे) जीव आणि परमात्मा हे एकत्र आहे हे –ानामुळे नाहीसे होते. कारण खरे –ान –ाल्याशिवाय मिथ्या–ानाची निवृत्ती होत नाही. अशा रीतीने अविद्येचा नाश –ाला म्हणजे जीव मुक्त होतो. त्याचा –ानाग्नि प्रारब्धाखेरीज बाकीची संचित आणि क्रियमाण या कर्माचा नाश करतो. या अवस्थेमध्ये प्रारब्ध कर्माचा केवळ उपभोग घेत असणारा शरीरादि अभिमान ज्याचा नष्ट आहे असा जो पुरुष त्यास जीवनमुक्त म्हणतात'.[5] आद्य शंकराचार्यांनी मांडलेल्या तत्त्व–ानाचा पं. श्रीधरशास्त्रींनी स्वतः अंगीकार केलेला होता. त्यानुरुप कार्य पं. श्रीधरशास्त्रींनी केलेले आहे. 'पाठकशास्त्री म्हणत असत की, निष्काम कर्म, भक्ती आदि चित्तशुद्धीचे पुष्कळ कारण आहे. चित्तशुद्धी म्हणजे प्राकृतिक नेत्रकर्णादि –ानेंद्रिये व हस्तपादादि कर्मेंद्रिये, मन, बुद्धि, श्रद्धा, इच्छाप्रभृति वृत्तींचे निवासस्थान जे अंतःकरण ते सर्वथा अंतर्बाह्य प्रवृत्ती पासून निवृत्त करणे होय. तात्पर्य, मनोनाश व वासनानाश –ाला म्हणजे चित्तशुद्धि –ÖÖ»ÖÖ. मनोवासनादींचा नाश विवेकाने होतो, तो निष्काम कर्मादिकांनी दृढ होतो. हा नाश म्हणजे चित्तशुद्धि आणि ही चित्तशुद्धी पूर्णतः पदरी पडून पवित्र –ाली म्हणजे अद्वैत सिद्धांताचे –ानवि–ान सुलभ होते आणि मनन निदिध्यासाने जीव मुक्त होतो'.[6] हे सर्व सांगत असतांना पं. श्रीधरशास्त्रींनी स्वतः या सर्व बाबी अंगी बाणविलेल्या दिसतात. 'पाठकशास्त्रींनी वेदांचे अपौरूषेयत्व सांगून वेदांत जे कर्म परम–ानी महर्षींनी स्वतः आचरले आणि जीवकल्याणार्थ जीवास आ–ापिंले ते कर्म जीवांने श्रद्धेने केलेच पाहिजे †ÃÖ ¯ÖŸÖ¯ÖÖ¤»Ö'.[7] भारतीय संस्कृतीचा आदर्श पाळणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने वैदिक धर्माचे यथार्थ पालन केले पाहिजे अशी पं. श्रीधरशास्त्रींची भूमिका होती. मानवी जीवनाच्या कल्याणार्थ आणि समाज विकासास ही बाब आवश्यक असल्याचे त्यांचे मत होते. 'अ–ानामुळे भासणारा जीव एकच आहे', अनेक नाही. तो एक असूनही सर्व जीवांची सुखदुःखे सारखी नसल्याचे कारण प्रत्येक जीवाचे अंतःकरण भिन्न आहे. म्हणून त्यांची सुखदुःखे वेगळी अनुभवास येतात. यास सर्वव्यापी चैतन्यरुप आत्मा असे म्हणतात. ईश्वर, जीव, साक्षी असे आत्म्याचे तीन भेद आहेत. आत्मा –ानस्वरुपी आहे. इतर

मताप्रमाणे तो –ÕÖŸÕÃ¾Ô¹ÿ¯ÕØ नाही. अ-ानामुळेच अहंकारादि उपाधींनी त्याचे –ÕÖŸÕŸ¾Ô - स्वरुप व प्रपंचाचे श्रेयत्व स्वरुप भासते'.[8] अशी अद्वैताविषयीची पं. श्रीधरशास्त्रींची मनोभूमिका होती. मानवी जीवनाविषयी ते म्हणतात, 'प्रारब्ध कर्म असेपर्यंत त्याच्या उपभोगाकरिता तो जिवंत राहतो. ह्या पुरुषास जीवनमुक्त असे म्हणतात. त्याचे प्रारब्ध संपले म्हणजे त्याचा देहपात होतो व त्यास विदेहमुक्त म्हणतात हीच परममुक्ती आहे. Êõ ÕÃÊÕŸØŸÕ •ÕØ¾ परमात्म्याचा सासज्याला जातो. अद्वैत मतामध्येच सासुज्यमुक्ति संभवते, इतर मनात सासुज्यमुक्ति संभवत नाही. त्या मताचे अनुयायी समीपता, स्वरुपता व सलोखता ह्या मुक्तिलाच मुक्तिसुख म्हणतात एवंच जीव Ã¾Ô¤Ô †ÕŸ´ÕÃ¾Ô¹ÿ¯ÕØ †ÕÆ. ŸÕÊÕØ×¯Õ ³Ô¾Ô¹ÿ¯ÕØ †ÕÆ, †-ानाने तो आपणांस सुखी व दुःखी असे समजतो व त्या ¾ÕÔÃÕ"ºÕ ŸÕØ ²Õ¨ ´Æ™»ÕØ •ÕØŸÕØ. †-ानाची निवृत्ती –ाली म्हणजे तो मुक्त होतो'.[9] या अ-ानापासून सुटका करण्यासाठी वेदविहित वर्णाश्रमकर्मांनी चित्तशुद्धि, ब्रह्मनिष्ठ गुरुला शरण जाणे, 'तत्त्व मासि' या उपदेशाचे श्रवण, मनन, हा मार्ग त्यांनी सांगितला आहे. मुक्तीचे साधन केवळ –ानच असल्याचे त्यांनी म्हटले आहे. अद्वैत, मतप्रणाली मांडत असताना त्यांनी मोक्षाचा मार्गही सांगितला आहे. वैदिक संस्कृतीचा, संस्कारांचा काटेकोर अवलंब केल्यास आश्रमधर्माचे पालन केल्यास, व्यक्तीला मोक्षावस्थेला पोहोचता येते, १९व्या शतकाच्या उत्तरार्धात प्रवृत्तीमार्गाची गोडी असलेला कर्मयोगावर विश्वास असणारा प्रभावी गट होता. पं. श्रीधरशास्त्री, प्रो. भानू यासारख्या मंडळीचा या लोकांच्या विचारसरणीला प्रखर विरोध होता. त्यांचे म्हणणे होते कर्मयोग वगैरेंच्या योगाने आमचा वेदांत खाली ओढू नका; तुम्हांस प्रवृत्तीमार्गाची गोडी वाटत असेल तर स्वच्छ तसे म्हणा; परंतु वेदान्त, निष्काम –ानमार्ग म्हणजे थोतांड आहे, याने ब»×¾Ô»Ô असले निरर्गल प्रलाप काढू नका; असे त्यांचे म्हणणे होते'.[10] समाजव्यवस्थेत द्वैतवादी मंडळी तत्त्व आणि आचार हे वेगवेगळे मानत होते. तत्त्व-ानाच्या नितीशी संबंध नाही हा «ŸÕ¾ÕØ¤Ô ´Õ>ÔÕ"ÕØ ×¾Ôचार पं. श्रीधरशास्त्रींना मान्य नव्हता. केवळ तत्त्व-ानाच्या गप्पा मारणे चुकीचे असते. जीवनात अद्वैत अनुभवणारे महात्मे हीच मानवजातीची आशा आहे. या महापुरुषांच्या आदर्शांनीच मानवजातीचा उत्कर्ष होतो. †«ŸÕ ŸÕ¢¾Ô–ान केवळ पुस्तकाच्या पानावर न राहता त्याचा अंगीकार जीवनाच्या प्रत्येक अंगात केला पाहिजे या विचाराचे पं. श्रीधरशास्त्री होते. त्यांनी स्वतःही त्या गोष्टीचा अंगीकार केला आहे. 'शंकराचार्यांच्या अद्वैत तत्त्व-ानाच्या सिंहगर्जनेने इतर तत्त्व-ाने पळून गेली असे म्हणतात. सिंह पाहताच कोल्ही-कुत्रीच नव्हे, तर प्रचंड हत्तीचीही तारांबळ उडते. शंकराचार्यांच्या अद्वैतामुळे द्वैतवादी पळाले, परंतु समाजातील द्वैत पळाले नाही! समाजातील दंभ, आलस्य, अ-ान, रुढी, भेदभाव, उच्च-नीचपणा, स्पृश्यांस्पृश्ये, वैषम्ये, द्रारिद्र्य, दैन्य, दास्य, दुबळेपणा, भ्याडपणा या गोष्टी पळाल्या नाहीत. ही सारी द्वैताची Õ•ÕØ †ÕÆ'.[11] पं. श्रीधरशास्त्रींनी अद्वैत तत्त्व-ानाचा प्रचार आणि प्रसार करुन हे महान कार्य केले. अद्वैतात कोणी श्रेष्ठ नाही, कोणी कनिष्ठ नाही. सर्व समान आहेत. अद्वैतात जातीभेद, उच्चनीच मान्य नाही. पं. श्रीधरशास्त्रींनीही कधीच जातियता पाळली नाही की उच्च जातीचा दंभ मिरवीला नाही. अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्यासाठी समाजप्रबोधन केले. आपल्या विचार-कार्यातून सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. म्हणजेच अद्वैत तत्त्व-ानाच्या नुसत्या गप्पा मारल्या नाहीत तर त्याचा अंगीकार केला. 'अद्वैत हा भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे. या तत्त्वाचा उत्तरोत्तर जीवनात अधिक अधिक अनुभव घेत जाणे म्हणजेच भारतीय संस्कृतीत भर घालणे होय. आपल्या सर्व आंतरबाह्य कृतीतून अद्वैताचा सुगंध जसजसा येऊ लागेल तसतसा भारतीय संस्कृतीचा आत्मा आपणांस समजू लागला आहे असे म्हणता येईल'.[12] Ã¾ÕÕ´ÕØ विवेकानंदांनी १९व्या शतकात आपल्या धर्माची आणि संस्कृतीची महती अखिल जगताला पटवून देत असतानाच अद्वैत तत्त्व-ानाचे महत्वही पटवून दिले. आमच्या आदर्श संस्कृतीत पूर्वजांनी प्रतिपादलेले अद्वैत तत्त्व-ान हा एक अमूल्य ठेवा आहे असे त्यांनी आपल्या व्याख्यानातून स्पष्ट केले. अद्वैतवादाविषयी बोलताना त्यांनी सांगीतले की, 'अद्वैतवादाच्या भाषेत हा आत्मा, वा ही वस्तु म्हणजेच ब्रह्मा ते एकमेवा द्वितीय ब्रह्मच नाम आणि रूप यांच्यामुळे बहु वा अनेक भासत असते. समुद्रावरील लाटांकडे बघा. त्यातील एकही लाट त्या समुद्रापासून खरोखर पृथक नाही. मग ती कशामुळे पृथक भासते? नाम आणि रूप यांच्यामुळे; त्या लाटेचा तो विशिष्ट 'आकार' आणि आपण त्या आकाराला दिलेले लाट हे 'नांव' ह्या दोहांमुळे ती समुद्रापासून पृथक वा वेगळी भासत असते. तिचे ते रूप आणि नाव निघून गेल्याबरोबर होता तसाच समुद्र शिल्लक राहतो. लाट आणि समुद्र यामध्ये कुणीही खरोखर फरक करु शकेल काय? तद्वतच, हे समस्त विश्व तीच एकमेव, एकसंघ, एकरस, अखंड सत्ता आहे. नाम आणि रूप यांनीच ही सारी विविधता नि विभिन्नता निर्माण केली आहे. सूर्य ज्यावेळी लक्षावधी जलबिंदूवर प्रतिबिंबीत होतो त्यावेळी ज्याप्रमाणे प्रत्येक बिंदूत सूर्याची एकेक पूर्ण प्रतिकृती उमटलेली दिसते, त्याचप्रमाणे ही विश्वातील एकमेव सत्ता, हा एकमेवाद्वितीय आत्मा ह्या निरनिराळ्या नाम - रूपांच्या असंख्य बुडबुड्यांवर प्रतिबिंबीत होऊन निरनिराळा भासत असतो. परंतु वस्तुतः तो आहे एकच, एकमेवाद्वितीयच. 'मी' किंवा 'तुम्ही' म्हणून काहीच नाही, सारे एकच आहे तो एकच विद्यमान आहे. एकतर म्हणा की सारे मी, नाहीतर म्हणा - 'सारेच तू' ही दोहोंची भावना, हा द्वैतबोध संपूर्णपणे मिथ्या –ानाचे - ह्या द्वैतबोधाचेच फळ होय. विवेकाचा उदय होऊन ज्यावेळी माणसाला आढळुन येते की दोन वस्तू वा द्वैत नाहीच, एकच वा अद्वैतच आहे, त्यावेळी त्याच्या प्रत्ययास येते की तो स्वतःच हे समस्त विश्वब्रह्मांड –ÕÕ»Ô»ÕØ †ÕÆ'.[13] †«ŸÕ ŸÕ¢¾Ô–ानात आत्मा हा एकमेवाद्वितीय असल्याचे आणि तो शुद्ध, अपरिवर्तनीय आहे असे प्रतिपादन केलेले आहे. विश्वातील बाकी बाबी या केवळ आभास आहे. या अद्वैत तत्त्व-ानाचा प्रचार आणि प्रसार पं. श्रीधरशास्त्रींनी आपल्या विचार-कार्यातून केला. अद्वैत आणि द्वैतविचारसरणीचा वाद अगदी पूर्वापार चालत आलेला आहे. अद्वैत तत्त्व-ानाच्या मते ही माया वा हे अ-ान, वा नाम-रूप, वा युरोपात ज्यांना 'देश - काल - निमित्त' म्हणण्यात येते तीच ह्या एका अनंत सत्तेतून विश्वाचा हा अनेकत्वाचा पसारा दाखवीत आहेत; परंतु वस्तुतः हे विश्व अभिन्न आहे, एक आहे. द्वैत खरोखरच खरे आहे असे जोवर कुणाला वाट राहील तोवर तो भ्रमात आहे असे समजावे. द्वैत ही भ्रांती आहे जेव्हा त्याला †«ŸÕÕ"ÕØ •Ôाणीव होईल, केवळ एकमेव सत्ताच काय ती अस्तित्वात आहे असे –ान होईल तेव्हाच त्याचा भ्रम दूर होऊन त्याला खरेखरे –ान –ाले. तेव्हाच त्याने खरोखर 'जाणले' असे म्हणता येईल'.[14] म्हणजेच अद्वैत तत्त्व–ÕÕच्या मते जगतात असलेले हे भेद केवळ नाम आणि रूपे यामुळेच आहेत. –ान ग्रहणाने मनातील हे भ्रम दूर होतील अशी धारणा अद्वैतवाद्यांची दिसून येते. समाजाला केवळ योग्य दिशेची, मार्गदर्शनाची गरज असते. ही मार्गदर्शकाची भूमिका स्वामी विवेकानंद, पं. श्रीधरशास्त्री पाठकांसारख्या व्यक्तींनी पार पाडली. समाजाला अ-ानाच्या अंधःकारातून मुक्त करुन प्रकाश–ÕÕŸÕ देण्याचे महत्वपूर्ण कार्य या समाजधुरिणांनी केले. श्रीमद आद्य शंकराचार्यांच्या तत्त्व-

ानाचा वारसा त्यांनी चालविला. ते तत्त्व-ान समाजमनांत रूजविण्याचा प्रयत्न केला. अद्वैत म्हणजे मा-यासारखाच दुसरा आहे ही भावना असणे होय. मला कोणी मारले, ŸÖ¸ मला दुःख होते. मला अन्नपाणी मिळाले नाही तर मा-ी प्राण कंठात येतात. मा-ा कोणी अपमान केला तर मेल्याहून मेल्याप्रमाणे मला होते. मला -ान मिळाले नाही, तर मला »ÖÖ•Ö ¾ÖÖ™ŸÖ. ´ÖÖ-याप्रमाणे दुस-याला असे होत असेल. मला मन, बुद्धी, हृदय आहे. दुस-यालाही ती आहेत. मला मा-ा विकास व्हावा अशी इच्छा आहे, तशीच ती दुस-यालाही असेल. मा-ी मान वर असावी, तशीच दुस-याचीही असणे योग्य आहे. थोडक्यात आपणांस येणा-या सुख-दुःखाच्या अनुभवांवरुन दुस-याच्या सुखदुःखांच्या कल्पना येणे, म्हणजेच एक प्रकारे अद्वैत, मला ज्या गोष्टींनी दुःख होते, त्या गोष्टी दुस-याच्या बाबतीत मी करणार नाही, हा त्यापासून मनाला बोध मिळतो. मला ज्या गोष्टींनी आनंद होतो त्या दुस-यासही लाभाव्यात असेही अद्वैत सांगते. अद्वैत म्हणजे अमूर्त कल्पना; अद्वैत म्हणजे प्रत्यक्ष व्यवहार, अद्वैत म्हणजे चर्चा नव्हे. अद्वैत म्हणजे अनुभूती'.[15] 'अद्वैत' संकल्पनेत प्रतिपाद्य सर्व बाबी पं. श्रीधरशास्त्रींनी आपल्या जीवनात अंगीकारण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यांच्या विचार-कार्यावर दृष्टीक्षेप टाकल्यास हे लक्षात येते. पं. श्रीधरशास्त्री अद्वैताच्या कल्पनेत केवळ रमले नाहीत, तर त्यात ते पूर्णपणे एकरूप -ाले. अद्वैत त्यांनी आपल्या अंगी बाणवला. त्यानुरुप ते जीवन जगले. अद्वैताचा विसर पडलेल्या समाजात जागृती निर्माण केली. भारतीय संस्कृतीच्या संगोपन आणि संवर्धनाच्या हेतूनेच पं. श्रीधरशास्त्रींनी अद्वैत तत्त्व-ानाचा अंगीकार केला. समाजाचे दुःख ते आपले दुःख मानले, समाजकार्यासाठी, समाजविकासासाठी त्यांनी स्वतःला पूर्णपणे -ोकून दिले. समाजातील दीन, दलीत, अबला महिलांच्या हक्क आणि अधिकारासाठी समाज प्रबोधनाचे कार्य केले. पं. श्रीधरशास्त्रींनी अद्वैत तत्त्वप्रणालीचा स्वतः अंगीकार केलेला असला तरी त्यांनी आपली तत्त्वप्रणाली समाजावर लादली नाही. आपण ज्या विचारसरणीचा अवलंब केला, तो समाजातील प्रत्येकाने केलाच पाहिजे. अशी अपेक्षाही त्यांनी कधी व्यक्त केली नाही. उलट प्रत्येकाला विचार आणि आचार स्वातंत्र्य असल्याने प्रत्येकाने प्रत्येक बाब पारखून अभ्यासून तिचा स्विकार केला पाहिजे; या विचारसरणीचे पं. श्रीधरशास्त्री होते. त्यांच्या या विचारसरणीबाबत वे.शा.सं. बाळाचार्य खुपेशास्त्री पं. श्रीधरशास्त्रींचा 'शास्त्रीबुवा' असा उल्लेख करुन लिहतात की, "नंदुरबार व शहादे येथील वार्षिक व श्रीद्वारकाधीशांच्या उत्सवप्रसंगी किंवा कुकुरमुंडे येथील संत खंडोजी महाराज ह्यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने शास्त्रीबुवांची जशी तेथे प्रवचने हÖŸÖ ŸÖ¿ÖÖ“Ö ´ÖÖ-ीही प्रवचने होत असत. शास्त्रीबुवा अद्वैत सिद्धांताचे निरूपण करीत, मी द्वैतसिद्धांताचे विवेचन करीत असे. अशा द्वैत-अद्वैताच्या परस्पर विरूद्ध निरूपणाने श्रोत्यांच्या विचारांमध्ये एक प्रकारचा गोंधळ निर्माण होतो. म्हणून अशी परस्पर विरुद्ध प्रवचने नसावीत असे मला वाटत असे. तसे त्यावेळी मी बोलून दाखविल्याचे स्मरते. पण संत केशवदत्त महाराज व संत संतोजी महाराज ह्यांच्या आग्रहाने मी त्यावेळी अशा तऱ्हेच्या प्रवचनास प्रवृत्त होत असे. अशी प्रवचने करीत असता अद्वैत सिद्धांताच्या विरुद्ध मी केलेल्या निरूपणाने शास्त्रीबुवांचे मन दुखावेल की काय? अशी आकांक्षा मा-या मनात उत्पन्न होऊन मी एकदा त्यांच्या याविषयीच्या मनोवृत्तीचा ठाव घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्यांनी दिलेले समतोलपणाचे उत्तर अद्यापही मला चांगले स्मरणात आहे. शास्त्रीबुवा त्यावेळी मला असे म्हणाले की, "हा «ŸÖ-†«ŸÖ ´ÖŸÖÖŸÖÖ»Ö -गडा कधीही न मिटणारा असा आहे. सभांतून शास्त्रार्थ ज्यावेळी चालतो त्यावेळी एखाद्या द्वैती पंडीताने किंवा एखाद्या अद्वैती पंडीताने आपल्या पांडित्याच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यास निरूत्तर केले. एवढ्यावरून ते म्ÖŸÖ“Ö ×ÃÖ¨ÖŸÖ3ÖŸÖ †ÖÆ असा निर्णय करू नये. प्रसंगी बुद्धीदोषांमुळे निरुत्तर होण्याची पाळी येते. याचा अर्थ 'मतिदोषिद्यं न मतदोवः।' असाच मानावयास पाहिजे. आपलेच मत हे सिद्धांत मत असा दुराग्रह कोणीही करु नये. ज्याने त्याने आपल्या कुलपरंपरेने प्राप्त -ालेल्या मतालाच चिकटून रहावे.

'येनास्य पितरो याता येन यातः पितामहाः ।
पथा तेनैव गन्तव्यं तेन गच्छन्न रिष्यति ।।'

'†Ö¯Ö»Ö ¾ÖÖ>¾ÖÖ>ÖÖ»Ö •या मार्गाने गेले त्या मार्गानेच आपण जावे, कुलपरंपरागत मार्गाने आपण जात असता आपणांस कोणताही धोका नाही'. ह्या वचनात स्पष्ट -ालेल्या धोरणानेच वागण्यामध्ये शहाणपणा आहे' असे उत्तर ज्यावेळी मी शास्त्रीबुवांचे तोंडुन ऐकले, त्यावेळी मला शास्त्रीबुवांच्या व्यवहार चातुर्यांची व लोकसंग्राहक बुद्धीची चांगली कल्पना आली'.[16] पं. श्रीधरशास्त्री हे कट्टर शांकरमतानुयायी होते. 'वेदांतवागिश' ह्या पदवीने ते विभूषित होते. परंतु त्यांनी स्वतःची विचारप्रणाली मांडीत असतांना परमताविषयी कधीही द्वेष, तिरस्कार किंवा असहिष्णूता दाखविली नाही. तसेच जबरदस्तीने अगर नाईलाजाने स्वमताचा त्याग केला नाही. गुरुपरंपरेने अगर कुलपरंपरेने आपणांस ज्या मताचा उपदेश -ाला त्याच मतांचा अवलंब करणे योग्य असल्याचे त्यांचे स्पष्ट मत होते. अन्य विचारसरणीच्या संदर्भात चर्चा करतांना त्या मताचा आदर करावा. त्या संदर्भात कधीही दुराग्रह करु नये असे त्यांचे स्पष्ट मत होते. 'स्वामीजींच्या प्रवचनांत सुद्धा हेच वैशिष्ट्य दिसून यावयाचे. श्रीमद्शंकराचार्यांच्या अद्वैतावर बोलतांना मध्वाचार्य, वल्लभाचार्य आदि आचार्यांचा उल्लेख सन्मानपूर्वक करावयाचा व विरूद्ध मतावर टीका, कोट्या न करीता स्वमत मांडावयाचे व विरूद्ध मताला खोटे न म्हणता त्या देश-काल-परिस्थितीत त्यांना ते स्फुरले असा समन्वय करुन तेही ईशसाक्षात्कारी महापुरुषी होते असा त्यांचा गौरव करावयाचा! सारांश, प्रवचनाबाबत 'नानपेक्षित मुच्यते।' असा दंडकच असावयाचा ह्यामुळे द्वैत, विशिष्टाद्वैत, वाल्लभ सांप्रदायी अशा सर्व मताच्या लोकांना स्वामीजÖÖ2ÖÖS»Ö †Ö¤¸Ö“Ö वाटावयाचा!'[17] आधुनिक धर्मांध शक्तीनी आदर्श घ्यावा असे पं. श्रीधरशास्त्रींचे व्यक्तिमत्व होते. अद्वैत तत्त्व-ानाचा प्रसार करीत असताना अद्वैत तत्त्वप्रणाली कशी योग्य आहे याचे सत्य स्वरुप मांडायचे. परंतु हे करीत असतांना दुस-या विचारसरणीचे दोष काढणे त्यावर टीका-टिप्पणी करणे यासारख्या गोष्टी पं. श्रीधरशास्त्रींच्या व्यक्तिमत्वात बसत नव्हत्या. जगत् कल्याणासाठी श्रीमद आद्य शंकराचार्यांनी ÖÖतिपादलेल्या अद्वैत विचारसरणीचा जयघोष अखिल विश्वात त्यांनी केला. पं. श्रीधरशास्त्रींनी केवळ विचारसरणीच मांडली नाही तर त्या विचारसरणीला अनुरुप असे वर्तन केले. समाजकार्यासाठी - समाजविकासासाठी अद्वैत विचारसरणीचा पुरेपुर उपयोग त्यांनी केलेला दिसतो. अखिल मानवजात सुखी - समाधानी असली पाहिजे हा एकच ध्यास त्यांचा होता. दीन - दलीतांना आपले मानणे, दुःखीतांचे अश्रू पुसणे, अबलांना न्याय देणे हे खरे अद्वैत पं. श्रीधरशास्त्री जगले. समाजाच्या दुःख निवारणार्थ आयुष्याच्या प्रत्येक वळणावर महत्वपूर्ण भूमिका त्यांनी पार पाडली. अद्वैत तत्त्व-ानाच्या माध्यमातून समाजात स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता निर्माण व्हावी यासाठी समाज प्रबोधनाचे कार्य केले.

संदर्भ साधने -

I. टिळक अनंत विश्वनाथ (चिटणीस), सावजी लक्ष्मण हरी (खजिनदार) **वेदशास्त्र शिक्षण संस्था, धुळे, (इतिवृत्तम**, Ã£½ÂÿÖ 1993 ÿÖ 1995), ¯Ö. 1.

II. साने गुरूजी, **भारतीय संस्कृती**, प्रकाशक, कुलकर्णी रत्नाकर अनंत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे (२०००, एकोणिसावे पुनर्मुद्रण), पृ. २०५.

III. **साप्ता. प्रबोधचंद्रिका**, 13 ´Ö 1935, ¯Ö. 6.

IV. कित्ता.

V. कित्ता.

VI. नाईक दिनकर सावळाराम (संपा.), **कै. सावळाराम मास्तर'** (चरित्र, आठवणी व तत्त्वविचार), प्रकाशक, तत्त्व-ानमंदिर, अमळनेर, (१९२९, प्रथमावृत्ती), पृ. ३०.

VII. कित्ता.

VIII. पाठक (महामहोपाध्याय) पंडित श्रीधरशास्त्री (अनुवादक), **नैष्कर्म्यसिद्धि : (मराठी अनुवाद)**, प्रकाशक, नाईक दिनकर Ã£½ÂÔÖ¸Ö´Ö (Ã£¯ÖÖ.), ÿÖ¢½Â-ानमंदिर, अमळनेर (शके १८६४, ¯ÖÊÖ´ÖÖ½Â¢ÖÖ), ¯Ö. 5.

IX. कित्ता, पृ. ६, ७.

X. मंगळवेढेकर राजा, **'साने गुरुजींची जीवनगाथा'**, प्रकाशक, प्रधान ग.प्र., (१९९२, द्वितीयावृत्ती), पृ. ७४, ७५.

XI. साने गुरुजी, पूर्वोक्त, पृ. ८.

XII. कित्ता.

XIII. स्वामी व्योमरूपानंद, (प्रकाशक), **स्वामी विवेकानंद ग्रंथावली संचयन**, प्रकाशक, स्वामी व्योमरूपानंद (अध्यक्ष) रामकृष्ण ´ÖŠ, धंतोली (नागपूर) (३० सप्टेंबर १९८७), पृ. १२३.

XIV. कित्ता, पृ. १२४.

XV. साने गुरुजी, पूर्वोक्त, पृ. २.

XVI. पाठक, चरित्रामृत, पूर्वोक्त, पृ. १३१, १३२.

XVII. कित्ता, पृ. १३२, १३३.